मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमधील प्रदूषण घटले

## हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्याने शहरवासीयांना मोठा दिलासा

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** अवकाळी पाऊस आणि धुक्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील वायू प्रदूषण कमालीचे घटले आहे. धुलिकणांचे प्रमाण ५० च्या दरम्यान आले आहे. हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्याने शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.



हिवाळ्यात जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. धुलिकणांचे प्रमाण वाढते. गेल्या काही दिवसात शहरातील प्रदूषणात मोठी वाढ झाली होती. त्यापार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने खबरदारी म्हणून विविध उपाययोजना हाती घेतल्या होत्या. मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या. दिवाळीत नागरिकांनी जोरदार फटके फोडले. फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली. दिवाळीत फटाके आणि निर्माणाधीन गृहप्रकल्पामुळे शहरातील निगडी, भोसरी, वाकड मधील भूमकर चौकातील हवेची गुणवत्ता अतिवाईट श्रेणीमध्ये गेली होती. हवा गुणवता निर्देशांकात धुलिकणांचे प्रमाण ३८० च्या पलीकडे गेले होते. दिल्लीनंतर पिंपरी-चिंचवड शहराच्या काही भागातील हवा प्रदूषित झाली होती. त्यामुळे शहरात सुरू असलेली बांधकामे सात दिवस बंद ठेवली होती. हवेची गुणवत्ता सुधारल्याने २० नोव्हेंबरपासून बांधकामे पुन्हा सुरू करण्यात आली होती. त्यानंतरही शहरातील भूमकर चौक, निगडी, भोसरी या भागातील हवेची गुणवत्ता (एक्यूआय) १०० ते १२५ होता. मात्र, अवकाळी पावसाने शहर आणि परिसराला चांगलेच झोडपले. धुकेही मोठ्या प्रमाणात पडत आहे. त्यामुळे शहरातील विविध भागातील हवेची गुणवत्ता ५० पर्यंत खाली आली आहे. परिणामी, प्रदूषणात मोठी घट झाली आहे. पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी म्हणाले, की शहरातील विविध भागातील धुलिकणांचे प्रमाण ५० च्या दरम्यान आले आहे. त्यामुळे प्रदूषणात घट झाली आहे.

### हवेची गुणवत्ता ५० पर्यंत खाली

**» हिवाळ्यात जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. धुलिकणांचे प्रमाण वाढते. गेल्या काही दिवसात शहरातील प्रदूषणात मोठी वाढ झाली होती. त्यापार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने खबरदारी म्हणून विविध उपाययोजना हाती घेतल्या होत्या. मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या. दिवाळीत नागरिकांनी जोरदार फटके फोडले. फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली. मात्र, अवकाळी पावसाने शहर आणि परिसराला चांगलेच झोडपले. धुकेही मोठ्या प्रमाणात पडत आहे. त्यामुळे शहरातील विविध भागातील हवेची गुणवत्ता ५० पर्यंत खाली आली आहे. परिणामी, प्रदूषणात मोठी घट झाली आहे.**

# पिंपरी- चिंचवड पोलीस मुख्यालयाला जागा देऊ नका!

## देहू विश्वस्थांची मागणी..बेमुदत उपोषण सुरू

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** देहू संस्थानच्या विश्वस्तांनी देहूच्या हक्काच्या गायरानासाठी बेमुदत उपोषणाची हाक दिली आहे. देहूच्या दीडशे एकर गायराना पैकी ५० एकर गायरान हे पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयाला देण्याच्या हालचाली सरकारकडून सुरु आहेत. याला देहूकरांचा विरोध असून हे गायरान देहूकरांच्या हक्काचं आहे, गायरानाला वारकरी भवनासह इतर वास्तू उभारण्यासाठी




आणि दिंडी विसाव्यासाठी आरक्षित करावं, अशी मागणी देहूच्या विश्वस्तांनी केली आहे. जोपर्यंत सरकार आमच्या बेमुदत उपोषणाची दखल घेत नाहीत, तोपर्यंत आम्ही उपोषण करण्यावर ठाम असल्याची भूमिका देहू संस्थानच्या विश्वस्तांनी मांडली आहे. 'गायरान वाचवागाव वाचवा' असे म्हणत त्यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या मंदिराच्या प्रवेश द्वारासमोरच बेमुदत उपोषण सुरू केले आहे. देहू संस्थानचे विश्वस्त माणिक महाराज मोरे म्हणाले, वर्षातून पाच मोठ्या यात्रा देहूत होतात. आषाढी वारीच्या पालखी प्रस्थानावेळी लाखो भाविक देहूत दाखल होतात, चारशे दिंड्या असतात. आमची २००१ पासून मागणी आहे, की गायरान आम्हाला द्या. तेव्हा ५० एकर जागेची मागणी आहे. आता शंभर एकर जागा द्यावी ही मागणी आहे. वारकरी भवन, निवासस्थान, अतिथी भवन, संत विद्यापीठ, गोशाळा आणि पालखी तळासाठी गायरानची जागा हवी आहे. या मागणीची शासनाने ताबडतोब दखल घ्यावी. आमचं हे आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू राहील. लवकरात लवकर प्रशासनाने हा प्रश्न मार्गी लावावा. गायरानची जागा देहूकरांनाच द्यावी. अशी मागणी देहू संस्थानकडून करण्यात आली आहे.

# आमच्या हक्काचं मैदान आम्हाला मिळालेच पाहिजे

## आमचे मैदान आम्हाला परत द्या, मोशीतून होतेय उपोषणाद्वारे मागणी

**मोशी। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** परिसरातील खेळाचे मैदान हॉर्स रायडिंगसाठी देण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने मंजूर केला आहे. त्याला मोशीकरांकडून विरोध केला जातो आहे. दोन दिवसांपासून शिवसेनेच्या रूपाली परशुराम आल्हाट यांनी आमरण उपषोण धरले आहे. तर दुसरीकडे शहर राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटून आमचे मैदान वाचवा अशी मागणी केली आहे. आमच्या




हक्काचं मैदान आम्हाला मिळालेच पाहिजे अशी मागणी मोशीमधून होत असून, विद्यार्थ्यांची स्वाक्षरी मोहीमही राबविण्यात आली आहे. मोशी-चिखलीतील रिव्हर रेसिडेन्सी श्रीराम चौकात उपोषण सुरु आहे. उपोषणाचा बुधवारी दुसरा दिवस आहे. चिखली-मोशीतील सुमारे एख हेक्टर जागा महापालिकेने सन २००५ साली खेळाच्या मैदानासाठी आरक्षित केली होती. १५ हजार ६०० चौरस मीटर भूखंड सन २०१० मध्ये टीडीआरच्या मोबदल्यात मूळ मालकाकडून महापालिकेच्या ताब्यात आला. मैदानालगत सीमाभिंत बांधून हे मैदान नागरिकांसाठी खुले करण्यात आले. या परिसरात मोठ-मोठे गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. या गृहसंस्थामधील अबालवृध्द या मैदानाचा वापर विविध खेळांसाठी, व्यायाम, चालण्यासाठी करतात. मात्र महापालिका आयुक्तांनी मोशीतील नागरिकांच्या हक्काचे मैदान थेरगाव येथील हर्षवर्धन देशमुख या व्यक्तीच्या थेरगाव येथील कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठान या संस्थेला हॉर्स रायडिंगसाठी करारपध्दतीने ठराव करून मोफत चालविण्यास दिले. मात्र ही संस्था प्रति व्यक्ती आठ ते दहा हजार रूपये शुल्क आकारणार असल्याचा आरोप रूपाली आल्हाट यांनी केला आहे. मोशीतील नागरिकांना, मुलांना जोपर्यंत त्यांच्या हक्काचे मैदान मिळणार नाही, तोपर्यंत माझे उपोषण सुरु ठेवण्याचा निर्धार आल्हाट यांनी केला आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन प्रा. कविता आल्हाट आणि शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी आमचे मैदान वाचवा दादा अशी मागणी केली आहे. त्यावर अजित पवार यांनी सकारात्मकता दाखवली असल्याचे आल्हाट सांगितले.

# थेरगावातील उद्यानांची दुरावस्था, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष!

## खासदार श्रीरंग बारणे यांनी केल्या अधिकाऱ्यांना सूचना

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** थेरगावातील लक्ष्मीबाई बारणे उद्यान, केजूदेवी बोट क्लब, खिंवसरा पाटील जलतरण तलावाची दुरावस्था झाली आहे. साहित्य अस्ताव्यस्थ पडले. ठेकेदार केवळ बीले उकाळण्याचे काम करत असून उद्यान विभागप्रमुखांचे दुर्लक्ष आहे. ठेकेदारकडील काम काढून महापालिकेने उद्यान चालविण्याची मागणी करत उद्यानांचा नागरिकांना फिरण्यासाठी नव्हे तर केवळ फोटोशुटसाठी उद्यान देऊन पैसे कमविले जात असल्याचा आरोप शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला. खासदार बारणे यांनी अधिका-यांसह थेरगावातील उद्यान, तलावाची पाहणी केली. अतिरिक्त आयुक्त प्रदिप



जांभळे-पाटील, सह शहर अभियंता मनोज सेठिया, उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे आदी उपस्थित होते. थेरगावातील लक्ष्मीबाई बारणे उद्यान, केजूदेवी बोट क्लब, खिंवसरा पाटील जलतरण तलावाची दयनीय अवस्था झाली आहे. ओपन जिमचे साहित्य तुटले आहे. बोट क्लबमध्ये कचरा साचला आहे. नागरिक सातत्याने

### अधिका-यांचा मनमानी कारभार

**» ठेकेदार केवळ बीले उकाळण्याचे काम करत असून उद्यान विभागप्रमुखांचे दुर्लक्ष आहे. ठेकेदारकडील काम काढून महापालिकेने उद्यान चालविण्याची मागणी करत उद्यानांचा नागरिकांना फिरण्यासाठी नव्हे तर केवळ फोटोशुटसाठी उद्यान देऊन पैसे कमविले जात असल्याचा आरोप शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला. अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे-पाटील, सह शहर अभियंता मनोज सेठिया, उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे आदी उपस्थित होते. थेरगावातील लक्ष्मीबाई बारणे उद्यान, केजूदेवी बोट क्लब, खिंवसरा पाटील जलतरण तलावाची दयनीय अवस्था झाली आहे.**

तक्रारी करत आहेत. परंतु, प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे. ठेकेदार केवळ बिले घेण्यापुरते काम करतात. उद्यान विभागाचे लक्ष्य नाही. फोटोशुटसाठी उद्याने देऊन पैसे कमविण्याचा धंदा चालविला आहे. टवाळखोरांचा धिंगाणा असतो, उद्यानात मद्यप्राशन करत बसलेले असतात. तिथे सुरक्षारक्षक नाहीत. सर्वसामान्य नागरिक उद्यानात जाण्यास घाबरत आहेत. ठेकेदाराकडून काम काढावे आणि महापालिकेने उद्यान चालवावे. रविकिरण घोडके हे केवळ नावापुरते उपायुक्त आहेत. ते कधी उद्यानांमध्ये जात नाहीत. त्यांचे कामावर लक्ष नाही. करोडे रुपये खर्च करुन बनविलेल्या उद्यानांची प्रशासनाच्या नाकर्ते पणामुळे दुरवस्था झाली आहे. तत्काळ उद्यानांची सुधारणा करावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. मागील दीड वर्षांपासून महापालिकेत नगरसेवक नाहीत. अधिका-यांना जाब विचारण्यासाठी कोण नाही. त्याचा गैरफायदा घेत मनमानी कारभार चालला आहे. याला लगाम घालण्याची आवश्यकता आहे. यासाठी गुरुवारी आयुक्तांना भेटणार असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# म्हाडा ५८६३ घरांसाठी ५ डिसेंबरला सोडत!

## ५९ हजारांहून अधिक अर्जदार सोडतीत होणार सहभागी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** म्हाडाच्या पुणे मंडळाच्या पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेंतर्गत उभारलेल्या ५८६३ घरांच्या विक्रीसाठी २४ नोव्हेंबर रोजी संगणकीय सोडत काढण्यात येणार होती. मात्र आता ही सोडत प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती. अखेर आता पुणे मंडळाने सोडतीची नवी तारीख जाहीर केली असून आता ५ डिसेंबर रोजी पुण्यात सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीत अंदाजे ५९ हजार अर्जदार सहभागी होणार आहेत. पुणे मंडळ क्षेत्रातील ५८६३ घरांच्या सोडतीच्या अर्जविक्री-स्वीकृतीला इच्छुकांनी बऱ्यापैकी प्रतिसाद दिला आहे. अर्जविक्री-स्वीकृतीच्या अंतिम मुदतीत ६० हजार अर्ज दाखल झाले आहेत. यातील अंदाजे ५९ अर्जदार पात्र ठरले आहेत. सोडतीच्या मुळ वेळापत्रकानुसार २४ नोव्हेंबरला सोडत काढण्यात येणार होती. मात्र काही प्रशासकीय कारणाने ही सोडत पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे अर्जदारांची सोडतीची प्रतीक्षा लांबली आहे. पण आता अखेर ही प्रतीक्षा संपली आहे. आता ५ डिसेंबर रोजी सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील यांनी दिली. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ही सोडत काढण्याचे नियोजन असून यासाठी अजित पवार यांची वेळ घेण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. म्हाडाच्या पुणे घरांसाठीची सोडत अखेर जाहीर झाली आहे. येत्या ०५ डिसेंबर २०२३ रोजी संगणकीय सोडतीत विजेत्यांची नावं घोषित केली जातील. गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली येथील विविध गृहनिर्माण




योजनेतील ५८६३ घरांसाठी लॉटरी जाहीर झाली होती. त्याची संगणकीय सोडत पुणे जिल्हा परिषद सभागृह येथे ०५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९ वाजता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत काढण्यात येणार आहे. पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे दि. ०५ सप्टेंबर, २०२३ रोजी सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. या सोडतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ५८६३ सदनिकांसाठी सुमारे ६० हजार अर्ज प्राप्त झाले . अधिवास प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वाढीव मुदत मिळण्यासाठी नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार व नागरिकांना सुविधा मिळावी यासाठी मंडळातर्फे सोडतीसाठी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. म्हाडा पुणे मंडळाच्या सोडतीत पुणे जिल्ह्यातील ५४२५ सदनिका, सोलापूर जिल्ह्यातील ६९ सदनिका, सांगली जिल्ह्यातील ३२ सदनिका व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या सोडतीत म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ४०३ सदनिका, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ४३१ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत २५८४ सदनिका व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत २४४५ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल, पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अशोक पाटील आदी या सोडतीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. म्हाडा लवकरच घरांच्या किमती कमी करणार आहे.अनेक दिवस म्हाडा लॉटरीतील पडून असलेल्या घरांच्या किंमती कमी होणार असल्याचं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी काही दिवसापूर्वीच सांगितलं होतं. संबंधित घरांचं वीज बिल, पाणी पट्टी भरावी लागत असल्यानं म्हाडाच्या वतीनं हा निर्णय घेण्यात आल्याचंही यावेळी मंत्री सावे यांनी सांगितलं. संबंधित घरांचं वीज बिल, पाणी पट्टी यामध्ये म्हाडाचा बराच पैसा खर्च होतो.

### ३३७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध

**» म्हाडा पुणे मंडळाच्या सोडतीत पुणे जिल्ह्यातील ५४२५ सदनिका, व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ४३१ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत २५८४ सदनिका व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत २४४५ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा तब्बल ११ हजार घरांची कमी किमती करुन पुन्हा विक्री करण्यात येणार असून नुकसान टाळत महसूल वाढीसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं.**

# पोलीस ससूनचे डीन डॉ. संजीव ठाकुरांना वाचवत आहेत!

## धंगेकरांचे पुणे पोलीस आयुक्त कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** ड्रग माफिया ललित पाटील प्रकरणात पुणे पोलिसांनी ससून रुग्णलयातील एक कर्मचारी आणि येरवडा कारागृहातील दोन कर्मचाऱ्यांना अटक केलीय, मात्र पोलीस ससूनचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाचवत असल्याचा आरोप करत आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुणे पोलीस आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन केलं. ललित पाटील ससून ऐवजी आपल्या सोसायटीत येऊन मुक्कम करायचा असा दावा पुणे कॅम्प भागातील एका सोसायटीतील रहिवाशांनी केल्यानं खळबळ उडालीय. ड्रग माफिया ललित पाटील आणि त्याचा साथीदार अभिषेक बलकवडे यांचे एक सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. त्यामध्ये ते निवांतपणे गप्पा मारताना दिसतायत. तो व्हिडीओ पुणे कॅम्प भागातील सेंट्रल पार्क सोसायटीतील आहे. रोझरी स्कुलचा संचालक विनय अरहानचे या सोसायटीत दोन फ्लॅट आहेत. बँकेची फसवणूक केल्याच्या आरोपावरून अटक असलेला विनय अरहाना ससुनमधील वॉर्ड नंबर १६ मधे रहात होता. तिथे त्याची ललित पाटील सोबत ओळख झाली.




या ओळखीतून ललित पाटील ससुनमधून निघून अरहानाच्या फ्लॅटवर मुक्कामाला जात होता . विनय अरहानाच्या इथल्या दोन फ्लॅटसाठी सेपरेट एंट्रन्स तयार करण्यात आल्यानं ललित पाटीलला या सोसायटीत बिनबोभाट येता येत होतं. इथूनच तो त्याच ड्रग रॅकेट चालवत असल्याचं पुढं समोर आलं. पण आपल्या सोसायटीत इतका गंभीर प्रकार सुरु आहे याचा या सोसायटीतील रहिवाश्यांना थांगपत्ताही नव्हता. पुणे पोलिसांनी या प्रकरणात ससून रुग्णालयात शिपाई म्हणून काम करणाऱ्या महेंद्र शवतेला अटक केली आहे. महेंद्र शेवते हा ललित पाटील आणि ससूनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील दुवा म्हणून काम करत होता. त्यामुळं ससूनचे माजी डीन डॉक्टर संजीव ठाकूर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्याकडून पुणे पोलीस आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. कारागृहातील कॉन्स्टेबल मोईन शेख आणि कौन्सिलर म्हणून काम करणाऱ्या सुधाकर इंगलेला अटक करण्यात आलीय. मात्र महेंद्र शेवते काय किंवा सुधाकर इंगळे काय, हे तर लहान प्यादे होते. ललित पाटील तीन वर्ष ज्यांच्या आशीर्वादानं ससून रुग्णालयात तळ ठोकून होता आणि ज्यांच्या मदतीनं येरवडा कारागृहातून तो ड्रग तयार करणारा कारखाना उभारू शकला, त्या वरिष्ठांपर्यंत पुणे पोलिसांचा तपास पोहचणार का हा खरा प्रश्न आहे . ही सोसायटी असेल , इथूनच जवळ असलेलं पंचतारांकित हॉटेल असेल किंवा तिथून जवळ असलेला मॉल असो, ललित पाटील या सर्व ठिकाणी अगदी निवांतपणे वावरायचा. अर्थात हे सगळं वरिष्ठांच्या आशीर्वादाशिवाय होणं शक्य नव्हतं.

# यंदा लोकसभेला मतदानाचा टक्का वाढणार?

## पुण्यात दोन दिवसांत ११ हजार जणांची मतदार नोंदणी

पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। लोकसभेला पुण्यात जेमतेम ५० टक्क्यांच्या आसपास मतदान होते. मात्र, नव्या वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पुण्यातून मतदानाचा टक्का वाढण्याची शक्यता आहे. कारण शनिवार-रविवार या दोन सुट्ट्यांच्या दिवशी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागात मिळून ११ हजार नागरिकांनी मतदार नोंदणी केली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १ जानेवारी २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांना मतदार म्हणून नोंदणी करता येणार आहे. त्यानुसार जिल्हा निवडणूक शाखेने २५ आणि २६ नोव्हेंबरला खास मतदार नोंदणी शिबिराचे विविध ठिकाणी आयोजन केले होते. या शिबिरात मतदार नोंदणी, नावांची वगळणी, तपशीलात दुरुस्ती, आधार क्रमांक जोडणी यासाठीचे एकूण ११ हजार ४९६ अर्ज प्राप्त झाले आहेत. या शिबिरांत नवीन मतदार नोंदणीचे जुन्नर विधानसभा मतदारसंघात ३३१, आंबेगाव २२७, खेड-आळंदी ५२२, शिरुर २८७, दौंड ६८६, इंदापूर २०१, बारामती ६५८, पुरंदर २४६, भोर २३४, वेल्हा ११२, मुळशी १३९, मावळ ६७२, चिंचवड २६६, पिंपरी २०३, भोसरी १८८, वडगाव शेरी २४८, शिवाजीनगर १२९, कोथरुड १२८, खडकवासला १२२, पर्वती १६१, हडपसर २७२, पुणे कॅन्टोन्मेंट २६६ आणि कसबा पेठ २०६ असे एकूण ६५०४ अर्ज प्राप्त झाले आहेत, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी सांगितले.




> आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ९ डिसेंबरपर्यंत मतदार नोंदणीसाठी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील अधिकाधिक नवमतदारांनी आपले मतदार यादीमध्ये नाव नोंदवावे. ज्या मतदारांनी नाव नोंदविले आहे त्यांनी मतदार यादीत आपले नाव, छायाचित्रे, पत्ता आदी तपशील पडताळून पाहावे, त्यामध्ये काही बदल असल्यास बदल करावेत. याकरिता भारत निवडणूक आयोगाच्या https://eci.gov.in/ या संकेतस्थळाला किंवा 'वोटर हेल्पलाईन' उपयोजनचा (ॲप) वापर करावा.
>
> – **डॉ. राजेश देशमुख**, जिल्हाधिकारी

# दूध मानकानुसार गायीच्या दुधाला ३३ रुपये दर द्या

## अखिल भारतीय किसान सभेची मागणी

पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। राज्यात संकलित होणार्या गायीच्या दुधाचे मानक पुर्वीच्या ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रतिऐवजी आता ३.२ फॅट व ८.३ एसएनएफ गुणप्रतीची वर्गवारी कायदेशिर मानकावर शासनाने शिक्कामोर्तब केले आहे. तसा शासन निर्णय राज्याच्या दुग्ध व्यवसाय विकास मंत्रालयाने बुधवारी (दि.२९) जारी केला आहे.

यामुळे कमी गुणप्रतिचे दूध सांगून दर कमी देण्यास चाप बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान,घोषित केलेल्या दुध मानकास प्रति लिटरला ३३ रुपये दर देण्याची मागणी अखिल भारतीय किसान सभेने केली आहे.

केंद्र सरकारने अन्न सुरक्षा व मानक अधिसूचनेतील उपनियमातील वेगवेगळ्या दुधातील किमान स्निग्धांश (फॅट) व किमान स्निग्धांशाव्यतिरिक्त इतर घन पदार्थ (एसएनएफ) यांची सुधारित मानके निश्चित केली आहेत. या अधिसूचनेचा आधार घेऊन राज्यात संकलित होणार्या वेगवेगळ्या वर्गवारीच्या दुधातील गुणप्रत स्विकृतीकरिता एकसुत्रता येण्यासाठी फॅट व एसएनएफ निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीर होती. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाच्या दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या उप सचिव अश्विनी यमगर यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

या बाबत अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सह सचिव डॉ. अजित नवले म्हणाले, शासनाने २२ नोव्हेंबरच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे आता शासना आदेश जारी केला आहे. मात्र ३.२ फॅट व ८.३ एसएनएफ गुणप्रतिच्या दुधाला प्रति लिटरला किती भाव देणार? हे जाहिर केलेले नाही. नवीन मानकानुसार गाय दुधाला प्रति लिटरला ३३ रुपये दर घोषित करण्याची आमची मागणी आहे. काही लोक आता ३.२ व ८.३ या गुणप्रतिच्या दुधाला ३४ रुपये मिळणार म्हणत सरकारचे स्वागत करत सुटले आहेत. पण ते त्यांचे अज्ञान आहे. म्हणून राज्य सरकारने आता मात्र ३.२ फॅट व ८.३ एसएनएफ गुणप्रतिच्या दुधाला बेस रेट जाहीर करावा व कंपन्या व संघांनी तो दिला नाही तर त्यांच्यावर कारवाई करावी अशी आमची मागणी असल्याचे ते म्हणाले.



> राज्य सरकारने घोषित केलेल्या मानकानुसार सहकारी दूध संघ दूध स्विकारीत होते आणि दरही देत आलेले आहेत. सद्यस्थितीत सहकारी दूध संघाकडे अतिरिक्त दुधाचा प्रश्न गंभीर झालेला आहे. त्यामुळे राज्य सरकारने मागे राबविलेल्या योजनेनुसार महानंदमार्फत अतिरिक्त दूध खरेदी करुन दूध पावडर तयार करावी आणि त्या दुधाला प्रति लिटरला पाच रुपये अनुदान दयावे. अन्यथ: सहकारी दूध संघाचा तोटा वाढून अडचणीत भर पडणार आहे. त्यामुळे शासनाने अतिरिक्त दुधाला अनुदान देण्याबाबत गांभीर्याने विचार करावा. तसेच दुधाच्या नव्या मानकाचा प्रति लिटरचा दर प्राप्त गंभीर स्थितीचा विचार करुनच जाहिर करणे अपेक्षित आहे.
>
> – **गोपाळराव म्हस्के**, अध्यक्ष, राज्य दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघ.